# सनविवि

ऑक्टोबर
नोव्हेंबर
२०२०

## महाराष्ट्र मंडळ बंगलोर

### संवाद

*नमस्कार मंडळी... या वर्षी मंडळाच्या इतिहासात आपण प्रथमच संपूर्ण गणेशोत्सव online साजरा केला. प्रतिकूल परिस्थितीवर तोडगा म्हणून आपण हा उपाय केला असला तरी इथून पुढे अनेक प्रकारचे उपक्रम या online माध्यमाद्वारे सादर करण्याचा एक श्रीगणेशाच झाला आहे... असं म्हणायला हरकत नाही. साहित्य स्पर्धांचे निकाल तर तुम्हाला गणेशोत्सव विशेषअंकात वाचायला मिळाले असतीलच. या अंकात इतर स्पर्धांचे निकाल तुम्हाला वाचायला मिळतील.*

*मराठी मनाचा आणखी एक उत्सव... दीपोत्सव... येऊ घातला आहे. परंतु मनासारख्या खरेदीसाठी बाहेरचं वातावरण अजूनही तितकंसं सुरक्षित नाहीये. याचसाठी महाराष्ट्र मंडळ घेऊन येत आहे.... e-Bazar. सर्वांनी याचा जरूर लाभ घ्या.*

*तसंच नोव्हेंबर महिन्यात आहे... दीपोत्सव ज्यात असणार आहे... किल्ले स्पर्धा, घराघरातील रांगोळ्या आणि एक सुरेल दिवाळी पाहाट...*

*तेंव्हा आशा करूया की या दिवाळीपुरतंच नव्हे तर इथून पुढचं सारं आयुष्यच या निरामय प्रकाशाने उजळून निघो. तोवर सर्वांनी सुरक्षित राहा... गर्दी टाळा... याच नव्हे तर मंडळाच्या प्रत्येक आनंदोत्सवात सहभागी व्हा.*

### *For upcoming programs and events*

***Do visit the website of the Mandal -***
www.mmbangalore.org

***You can also follow the Facebook page –***
https://www.facebook.com/MMBlr.org/

***If you are on twitter, follow us at –***
https://twitter.com/mandalblr

***If Instagram is your thing, we are at –***
https://www.instagram.com/maharashtramandalbengaluru/?hl=en

***If you are a YouTuber, you can find us on –***
https://www.youtube.com/channel/UC9zazbhMNkUO0mZglJ4icDQ?view_as=subscriber

***We also podcast on –***
https://anchor.fm/maharashtra-mandal-bengaluru

***Join our mailing list by simply sending a mail to mmbangalore-subscribe@yahoogroups.com***

## *आगामी*

नमस्कार मंडळी

ऑक्टोबर आणि नोव्हेंबर महिन्यात दीपोत्सवानिमित्त प्रेक्षकांना मेजवानी !!

- e बाजार ( १७ आणि १८ ऑक्टोबर रोजी )
  दिवाळीचा फराळ, पणत्या, उटणे, इतर डेकोरेटिव्ह वस्तू, कपडे, इमिटेशन ज्वेलरी आणि इतर बऱ्याच प्रकारचे स्टॉल आपण इ बझार मध्ये बघणार आहात आणि दिवाळीसाठी आपल्या ऑर्डर्स नोंदवू शकणार आहात .
- दिवाळीच्या निमित्ताने **ऐतिहासिक किल्ले** करण्याची एक कौटुंबिक स्पर्धा आयोजित केली आहे
  अधिक माहितीसाठी संपर्क - समीर प्रधान – 9833264255
- दिवाळीची तयारी म्हणून *आकाश कंदील करण्याची कार्यशाळा* आयोजित करणार आहोत
  अधिक माहितीसाठी संपर्क – रुपाली मेहेंदळे -9987794795
- विविध प्रकारच्या **घराघरातील रांगोळ्या**
- सुरेल **दिवाळी पहाट**

दीपोत्सवातील सर्व कार्यक्रम आपण मंडळाच्या website वर आणि facebook page वर बघू शकणार आहात. जास्तीत जास्त प्रेक्षकांनी मंडळाच्या वेबसाईट वर विझिट करून दीपोत्सवाचा आनंद लुटावा !!

∞∞∞∞∞∞∞∞

## देहे त्यागिता किर्ती मागे उरावी* -

अवयवदानावरील प्रश्नमंजुषा स्पर्धा.

महाराष्ट्र मंडळाच्या सामाजिक बांधिलकी उपक्रमा अंतर्गत अवयवदानावर प्रश्नमंजुषा स्पर्धा घ्यायची ठरवलं आणि लक्षात आलं, मुळातच अवयवदान या विषयाबद्दल जनसामान्यांत माहितीपेक्षा गैरसमजुती अधिक आहेत. म्हणून *"अवयवदान ज्ञानभांडार"* ही पुस्तिका तयार केली, ज्यात आठ प्रकरणे आहे. प्रत्येक प्रकरणामधे माहिती आणि त्याच्यावरचे प्रश्न 3आहेत.

**आठ दिवस रोज , हे प्रश्न व्हाट्सॲप वर पाठवले जातील.**

प्रश्न ऑब्जेक्टिव्ह स्वरूपाचे आहेत आणि गूगल Quiz फॉरमॅट मध्ये तयार केले आहेत. म्हणजे प्रश्न सोडवून झाले आणि सबमिटचे बटण दाबले की लगेच स्पर्धकांनी मिळविलेले गुण आणि त्यांना त्यांच्या ज्ञानात काय भर घालायला पाहिजे ते मोबाईलवरच कळेल.
33

**आठ प्रकरणे संपल्यानंतर online प्रश्नमंजुषा स्पर्धा घेतली जाईल.**

स्पर्धेत सहभागी होण्यासाठी - 91-6366651100
या नंबर वर *'महाराष्ट्र मंडळ स्पर्धेसाठी'* अशी पोस्ट व्हाट्सॲप वरून पाठवायची.
आठही प्रकरणांवरील प्रश्नांची उत्तरे पाठवणाऱ्यांना सर्टिफिकेट दिले जाईल .
शिवाय अंतिम स्पर्धेत *पहिल्या येणाऱ्या दहा स्पर्धकांना* रोख पारितोषकही देण्यात येईल.


शताब्दी
SWAKRUTA
CHARITABLE TRUST
Maharashtra Mandal Bengaluru
& Swakruta Charitable Trust
launching an unique shopping experience
Diwali Online Shopping Stalls
17th & 18th October, 2020
e-bazaar
Jewelry
Food
Gifts
Furnishing
Clothing
Decoratives
Eco-Friendly
Artifacts

|| शताब्दी महोत्सव : १९२०-२०२० || शतवर्षांचे अतूट नाते माऊली मराठीशी ||

## महाराष्ट्र मंडळ, बेंगळूरू आणि
## स्वकृता चॅरिटेबल ट्रस्ट, बेंगळूरू
### संयुक्तपणे आयोजित करीत आहेत...

### १३ ते १६ नोव्हेंबर, २०२०

# दीपोत्सव-२०२०



**दीपावलीचा सण म्हणजे उत्साह, आनंद, सुख-समृद्धीचा सोहळा!**

**यंदाच्या Virtual दीपोत्सवाची विशेष आकर्षणे आहेत:**

* e - बाजार
* ऐतिहासिक किल्ले स्पर्धा
* आकाश कंदील निर्मिती कार्यशाळा
* घराघरातील रांगोळ्या आणि
* एक सुरेल दिवाळी पहाट

दिवाळीचा आनंद द्विगुणित करण्यासाठी नक्की भेट द्या या Links वर:

**www.mmbangalore.org**

**https://www.facebook.com/MMBlr.org/**

**www.Swakruta.in**

## *विशेष सर्वसाधारण सभा*

**महाराष्ट्र मंडळ बंगलोरची विशेष सर्वसाधारण सभा रविवार दिनांक १ नोव्हेंबर रोजी संध्याकाळी ५ वाजता झूम व्यासपीठावर होणार आहे. त्यासंबंधीची नोटीस सर्व सभासदांना पाठवण्यात येणार आहे. कृपया सर्व सभासदांनी याची नोंद घ्यावी .**

## घडामोडी:

***शताब्दी २०२० गणेशोत्सव - फुल्ल offline ते फुल्ल online***

गणपतीच्या कार्यक्रमांमध्ये वैविध्य असावं, सर्व स्थानिक आणि आमंत्रित कार्यक्रमांनाही स्थान देऊन , उत्सवादरम्यान एक ऊर्जा पण जपता यावी, म्हणून सकारात्मक भावना जपत आनंदोत्सवच साजरा करायचा ठरला . आणि हीच **सकारात्मक भावना** ठरली यंदाच्या गणेशोत्सवाची *मध्यवर्ती संकल्पना*.

संपूर्ण गणेशोत्सवच नव्हे तर त्याची आखणी आणि तयारीसुद्धा ऑनलाइनच करायची हे मोठेच आव्हान आहे हे लक्षात आले. सर्वच कार्यक्रमांसाठी तंत्रज्ञानावर अवलंबून राहायचे होते. प्रोग्रॅम कॉर्डिनेटर आणि टेक्निकल कॉर्डिनेटर यांचे कौशल्य खरोखरच पणाला लागले !!

पहिल्या दिवशी मंडळातील बाप्पाच्या प्रतिस्थापनेचे दृक्- श्राव्य दर्शन घडवून , २२ ऑगस्ट ते १ सप्टेंबर अश्या ११ दिवसाच्या गणेशोत्सवाची सुरुवात झाली .त्यानंतर प्रत्येक दिवशी *घराघरातील बाप्पांचे* दर्शन पण उत्साही सभासदांच्या सहभागाने सहज शक्य झालं. गणेश स्थापनेनंतर संध्याकाळी *ऑनलाईन अथर्वशीर्ष* च्या आयोजनाला भरपूर प्रतिसाद मिळाला आणि अथर्वशीर्षाची पंचवीस आवर्तनं काही व्हिज्युअल्स सकट फारच छान रीतीने झाली.

विविध गुणदर्शन सारख्या सर्वप्रिय स्पर्धेपासून जोडी तुझी माझी सारख्या नवीनच युगल नृत्याच्या स्पर्धेपर्यंतच नव्हे तर स न वि वि तील स्पर्धांच्या विषयांपर्यंत सकारात्मकता या मध्यवर्ती कल्पने भोवती सादरीकरण होते. सर्वच स्पर्धांसाठी परीक्षक निवडतांना दरवर्षी काही मर्यादा असतात पण यावर्षी परीक्षकांना पण ऑनलाईनच सहभागी होता येणार असल्यामुळे बंगलोरच्या भौगोलिक मर्यादांबाहेर जाऊन परीक्षकांचा विचार करता आला आणि तसे परीक्षक लाभलेही. सनविवि च्या सर्व स्पर्धा बेंगलोर बाहेरील मराठी हौशी लेखकांसाठी खुल्या केल्यामुळे त्यांनाही भरपूर प्रतिसाद मिळाला.

उत्सवादरम्यान झालेल्या आमंत्रित कार्यक्रमांमध्ये गणपती आणि कुटुंबीयां बरोबरच्या त्याच्या नातेसंबंधांवर झालेला ***सर्व नंदन*** हा कार्यक्रम विशेष उल्लेखनीय म्हणावा लागेल. बेंगलोर मधील अगदी तरुण अशा संगीत आणि साहित्याची आवड असणाऱ्या दोन उत्साही अमराठी युवकांनी, म्हणजेच *विवेक सदासिवम* आणि *विनय वाराणसी* यांनी सादर केलेला हा कार्यक्रम - त्यातील कथनशैली आणि कर्नाटकी संगीताच्या पार्श्वभूमी वरील गायनाने आगळा वेगळाच ठरला !! त्याशिवाय मराठी रंगभूमीवरील प्रसिद्ध अभिनेता ***शरद पोंक्षे** यांची विघ्नेश जोशी यांनी घेतलेली मुलाखत* सर्वांची प्रशंसा, आणि सकारात्मकतेच्या मध्यवर्ती कल्पनेला अनुसरून असल्याची ग्वाही मिळवून गेली . संदीप खरे आणि मधुराणी गोखले यांच्या ***आभाळभर कवितांनी*** वेगळाच माहौल बनवला !!

मंडळातर्फे एखाद्या अनोख्या क्षेत्रात अनोखं काम करणाऱ्या व्यक्तीला दिला जाणारा ***भीष्म पुरस्कार**चा सोहळा* असो कि *सनविवि प्रकाशनाचा नेहमीचा सोहळा*, एवढेच काय तर अगदी पुरस्कारांच्या उद्घोषणां चा कार्यक्रम परीक्षकांच्या मनोगता सकट *गणेशोत्सव २०२० च्या झूमपीठावर* अगदी दिमाखात पार पडला !!!

सरतेशेवटी मंडळी, जाता जाता हा ऑनलाइन गणेशोत्सव भविष्यातील गणेशोत्सवांची एक झलक देऊन गेला !! ऑनलाइन प्रक्षेपणामुळे वाढलेला प्रेक्षक वर्ग आपण नेहमीच जोडून ठेवायचा आहे आणि त्याच बरोबर प्रत्यक्ष भेटीचा पारंपारिक समारंभ सुद्धा साजरा करायचा आहे!!

---- रेखा नाईक

∞∞∞∞∞∞∞∞

गणेशोत्सवात आयोजित करण्यात आलेल्या विविध गुणदर्शन ( ऑनलाईन ) स्पर्धेत स्नेहाधारा, रंगकर्मी, आपुलकी, मैत्री, युवा, मराठी मंडळ बंगलोर साऊथ आणि महाराष्ट्र मंडळ उत्तर विभाग असे सात संघ सहभागी झाले होते. सहभागी झालेल्या सर्व स्पर्धकांचे अभिनंदन आणि विजेत्यांचे विशेष कौतुक

**बक्षिसांचे मानकरी खालीलप्रमाणे**

"कुसुताई दिक्षित करंडक" विविध गुण दर्शन स्पर्धा

करंडकाचे मानकरी - "मैत्री" संघ
द्वितीय - युवा संघ
उत्तेजनार्थ - आपुलकी संघ

**१. उत्कृष्ट संकल्पना विस्तार / संहिता लेखन -**

प्रथम - मैत्री - राजश्री जोशी व शशीशेखर चौगुले
द्वितीय - युवा - प्रमोद खाडिलकर

**२. उत्कृष्ट निवेदन -**

प्रथम - मैत्री- शशीशेखर चौगुले
द्वितीय - युवा - ओंकार रांगणेकर

**३. विशेष उल्लेखनीय वैयक्तिक प्रस्तुती -**

- ✓ अभिनेता - युवा - संजय राऊत
- ✓ अभिनेत्री- आपुलकी- गौरी नातु
- ✓ गायक/ गायिका - विभागून
  मराठी मंडळ बंगलोर साऊथ -केदार कुलकर्णी व युवा - मंगेश गणपुले
- ✓ नृत्य - वैयक्तिक- आपुलकी - श्रेया देशपांडे
  सांघिक- मैत्री

**४. परिक्षकांची विशेष पारितोषिके-**

- ✓ संकलन /editing- आपुलकी
- ✓ छायांकन/ cinematography- मैत्री
- ✓ नृत्य दिग्दर्शन- मैत्री
- ✓ वेशभूषा - आपुलकी
- ✓ संगीत - युवा.

∞∞∞∞∞∞∞∞∞∞

***परीक्षकांचा अभिप्राय***

नमस्कार…
सर्वप्रथम महाराष्ट्र मंडळ बंगलोरनी माझी  विविध गुणदर्शन या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून निवड केल्याबद्दल त्यांचे खूप खूप आभार.  सध्या महाराष्ट्रात विविध गुणदर्शन अशाप्रकारचे कार्यक्रम फार मागे पडत चालले आहेत . अशा प्रकारचे कार्यक्रम बघायचा योग् बऱ्याच वर्षांनी आला. बंगलोर महाराष्ट्र मंडळाने आयोजित  केलेल्या या स्पर्धा मला सुखद आनंद देऊन गेल्या .
सर्व संघांचा online सादरीकरणाचा पहिलाच प्रयत्न असला तरी कुठल्याही संघांचे सादरीकरण कुठेही amature  आहे असे वाटले नाही . सर्व संघांचे  को-ऑर्डिनेशन छान होते.
बक्षिसासाठी आम्ही खालील प्रकारे निकष लावले
१.  दिलेल्या गाण्याला  कितपत न्याय मिळतोय , गाण्याचा मूड आणि त्याचे इंटरप्रिटेशन सादरीकरणात कशाप्रकारे घेतलं गेलं आहे
2 विविध गुणदर्शन कार्यक्रमात विविधता असणारच कारण नावच विविध गुणदर्शन आहे ,पण  पुर्ण कार्यक्रमात सुसूत्रता आहे की नाही,  वेगवेगळी सादरीकरणे निवेदक छान प्रकारे जोडत आहेत का हे सुद्धा बघितलं गेलं
३. सुरुवातीपासून शेवटपर्यंत संपूर्ण सादरीकरणाचा इफेक्ट कसा होतो हाही एक क्रायटेरिया ठरवला होता

आपण सिनेमा किंवा नाटक बघतो त्यात सुरूवात मध्य आणि शेवट क्लायमॅक्स असतो , तसंच पहिला परफॉर्मन्स नंतर दुसरा परफॉर्मन्स ,त्यानंतरचा परफॉर्मन्स यांची लिंक लागते आहे की नाही हे व्यवस्थित बघायला हवं. पूर्ण व्हिडिओ करून झाल्यानंतर परत एकदा आपल्या सादरीकरणात सुसूत्रता आहे की नाही हे प्रत्येक संघाने बघायला हवे.
सर्व संघांनी आनंदाने , प्रेमाने  आणि उत्साहाने सर्व कार्यक्रम सादर केले .
पुढेही अशा ऑनलाईन स्पर्धा घ्यायला काहीच हरकत नाही.

धन्यवाद,

रीमा अमरापूरकर , मुंबई
( परिक्षक , वि गु. द. स्पर्धा २०२० )

∞∞∞∞∞∞∞∞∞∞

नमस्कार…
२०२० चा हा गणेशोत्सव आपल्या सर्वांच्या कायम लक्षात राहील अशा अभूतपूर्व परिस्थितीत साजरा केला गेला अतिशय उचित विषय आपल्या समोर महाराष्ट्र मंडळ समितीने मांडला होता.  तुम्हा सर्व कलाकारांचे आणि संघांचे हिरिरीने भाग घेतल्याबद्दल हार्दिक अभिनंदन.  आम्हाला ही मेजवानी दिल्याबद्दल मंडळाला धन्यवाद,  आम्हा परीक्षकांना ही संधी दिल्याबद्दल महाराष्ट्र मंडळाचे मनपूर्वक आभार.
सर्व स्पर्धक संघांनी उत्तम सादरीकरण केले होते. परंतु स्पर्धा म्हटल्यावर काही निकष लावून बक्षिसपात्र व्यक्ती आणि संघ निवडले गेले.

धन्यवाद,

योगेश सेवक
( परिक्षक , वि गु. द. स्पर्धा २०२० )

∞∞∞∞∞∞∞∞∞∞

गणेशोत्सवात आयोजित करण्यात आलेल्या जोडी तुझी माझी  या युगल नृत्याच्या स्पर्धेत १५ संघांनी भाग घेतला  होता. परीक्षक म्हणून  राधिका चव्हाण, पुणे व मिथिला शेंड्ये , मुंबई  यांनी चोख कामगिरी बजावली.

**बक्षिसांचे मानकरी खालीलप्रमाणे**

- प्रथम - मिथिला व ललिता होल्ला
- द्वितीय - ज्योती सोलापुरे व काजल भास्कर
- तृतीय - पल्लवी पोतनीस देशमुख व तेजस्विनी सालगोडे
- उत्तेजनार्थ १ - समीर आणि अनुजा भागवत
- उत्तेजनार्थ २ - गौरी आणि सई खांडेकर

सर्व स्पर्धकांचे अभिनंदन व विजेत्यांचे विशेष कौतुक

∞∞∞∞∞∞∞∞∞∞

गणेशोत्सवानंतर शताब्दी महोत्सवातील कार्यक्रम  -  शब्दाक्षरी

मराठी साहित्य आणि हिंदी- मराठी गाण्यांवर आधारीत एक आगळी वेगळी स्पर्धा सप्टेंबर महिन्यात घेण्यात आली . एकूण १८ संघांनी स्पर्धेत भाग घेतला होता. स्पर्धेची अंतिम फेरी ४ ऑक्टोबर रोजी पार पडली. त्याचे live प्रक्षेपण मंडळाच्या वेबसाइट वर दाखवण्यात आले.

स्पर्धेचे संयोजन नेहा फडके हिने उत्तमरित्या केले. विद्या पळसुले, मुग्धा कोपरकर, आरती लागवणकर यांनी नेटके सूत्र संचालन केले , तर अनुराधा चौगुले, सुचित्रा व आमोद खांडेकर, सुनीती व गजानन फडके, विवेक पळसुले , वैशाली व प्रसाद तोरवी यांनी बॅकस्टेज उत्तम  सांभाळले.

**बक्षिसांचे मानकरी खालीलप्रमाणे**

- प्रथम थम - पल्लवी व सचिन येरनाळकर
- द्वितीय - सविता व उदय काळगावकर
- तृतीय  - देवश्री व राहुल धरणगावकर
- उत्तेजनार्थ - कीर्ती व सर्वेश रानडे

सर्व स्पर्धकांचे अभिनंदन व विजेत्यांचे विशेष कौतुक

∞∞∞∞∞∞∞∞∞∞

## *रेशिमगाठी*

**विवाहेच्छू  तरुणी**

१. वय  २६, उंची  ५ फूट ५, शिक्षण  B. E. , M.Tech ( computer Science), नोकरी / व्यायसाय  - पुणे येथे सॉफ्टवेअर कंपनीत नोकरी, अपेक्षा - उच्चशिक्षित, ब्राह्मण, संपर्क - ९४२५३१३४३९ , ९८४५५४६३९९, ई-मेल  jayant_velankar@rediffmail.com
२. वय  २५, उंची  ५ फूट ८ इंच, शिक्षण  BAMS ( आयुर्वेदिक डॉक्टर ), नोकरी / व्यायसाय  - उज्जैन येथे इंटर्नशिप करते आहे, अपेक्षा - उच्चशिक्षित, ब्राह्मण, संपर्क - ९४२५३२१४०१ ,९९०२२२७०३५

**विवाहेच्छू तरुण**

१.  वय  २६, उंची  ६ फूट, शिक्षण  B. E. , ( computer Science), नोकरी / व्यायसाय  -  Zeta India , बंगलोर येथे नोकरी, अपेक्षा - इंजिनिअर , नोकरी करणारी, संपर्क - ९८४४४२६३२३, ई-मेल  riteshsanjaymahajan@gmail.com

∞∞∞∞∞∞∞∞∞∞